डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) – २०१९ व २०२० या दोन वर्षाकरिता

## जाहिरात क्रमांक: /२०१९ व २०२०

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक, सामाजिक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणासाठी १०७ वर्षांपूर्वी सन १९१३ साली कोलंबिया येथे प्रस्थान केले होते. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बार्टी मार्फत सन २०१३ पासून "डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)" सुरु करण्यात आली. त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील एम.फील व पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधना करिता प्रोत्साहन व आर्थिक सहाय्याच्या स्वरुपात अधिछात्रवृत्ती देण्याकरिता ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहे.

**अधिछात्रवृत्ती संख्या व आरक्षण:-**

| प्रवर्ग | एम.फिल./पी.एच.डी. एकूण |
|---|---|
| दिव्यांग (५ %) | १० |
| महिला (३०%) | ५७ |
| सर्वसाधारण पुरुष व महिला | १३३ |
| **एकूण संख्या** | **२००** |

टीप- प्रति वर्ष -२०० अधिछात्रवृत्ती संख्या ( २००+२०० =४००)

**पात्रता निकष:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी व अनुसूचित जातीचाअसावा.
२. दिनांक: ०१ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ दरम्यान संबंधित विद्यापीठामध्ये एम.फिल.व पीएच.डी करिता नोंदणी असलेले विद्यार्थी BANRF- २०१९ अधिछात्रवृत्ती साठी ऑनलाइन अर्ज करू शकतात तसेच ०१ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२० दरम्यान संबंधित विद्यापीठामध्ये एम.फिल.व पीएच.डी करिता नोंदणी असलेले विद्यार्थी BANRF- २०२० करिता अधिछात्रवृत्ती साठी ऑनलाइन अर्ज करू शकतात.
३. अर्जदाराने एम.फिल.व पीएच.डी. च्या नोंदणी दिनांकापासून खाजगी, शासकीय व इतर कोठेही पूर्ण/अर्ध वेळ नोकरीच्या स्वरुपात तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करून आर्थिक उत्पन्नाचा लाभ घेतलेला नसावा/घेत नसावा किंवा अर्थाजन केलेले नसावे/करत नसावे.
४. एम.फिल / पीएच.डी अर्जदाराने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती किंवा इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा/घेत नसावा.

**(मार्गदर्शक तत्वे** (BANRF २०१९-२०२० Guideline) **बार्टीच्या** https://barti.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत)**

**अधिछात्रवृत्ती अंतर्गत देण्यात येणारे लाभ:-**

**एम.फील करिता :**

१) निवड करण्यात येणाऱ्या अर्जदारांना एम.फिल. करिता २ वर्षे Junior Research Fellowship (JRF) प्रति महा रु.३१,०००/- प्रमाणे अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात येणार आहे.
२) शासकीय नियमानुसार घरभाडे भत्ता, आकस्मित खर्च इ. बार्टी मार्फत देण्यात येणार आहेत.

**एम.फील + पीएच.डी (इंटिग्रेटेड) करिता**

**१)** निवड करण्यात येणाऱ्या अर्जदारास एम.फिल करिता २ वर्षे Junior Research Fellowship (JRF) प्रति महा रु.३१,०००/- प्रमाणे व पीएच.डी करिता उर्वरित ३ वर्षे करिता Senior Research Fellowship (SRF) प्रति महा रु.३५,०००/- याप्रमाणे अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात येणार आहे.

२) शासकीय नियमानुसार घरभाडे भत्ता, आकस्मित खर्च इ. बार्टी मार्फत देण्यात येणार आहेत.

**पीएच. डी करिता**

१) निवड करण्यात येणाऱ्या अर्जदारास पीएच.डी करिता २ वर्षे Junior Research Fellowship (JRF) प्रति महा रु.३१,०००/- प्रमाणे व उर्वरित कालावधीकरिता Senior Research Fellowship (SRF) प्रति महा रु.३५,०००/- याप्रमाणे अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात येणार आहे. (upgradation प्रमाणपत्राच्या आधारे)

२) शासकीय नियमानुसार घरभाडे भत्ता, आकस्मित खर्च इ. बार्टी मार्फत देण्यात येणार आहेत.

**अटी व शर्ती:-**

१. अधिछात्रवृत्ती BANRF-२०१९ व BANRF-२०२० करिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती अंतर्गत दिले जाणारे सर्व लाभ संबंधित विद्यापीठ / संस्था यामध्ये नोंदणी दिनांकापासून (Registration Date) लागू होतील.

२. प्रस्तुत BANRF-२०१९ व BANRF-२०२० करिता फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील इतर कोणत्याही पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

३. विद्यापीठात नोंदणीकृत नसलेले अर्जदार BANRF-२०१९ व BANRF-२०२० करिता अर्ज करण्यास पात्र नसतील.

४. अर्जदार यांनी वेब-बेस्ड (Web Based) ऑनलाइन अर्ज https://barti.maharashtra.gov.in>Notice Board>Online Application BANRF- २०१९ व BANRF-२०२० या संकेतस्थळावर

**किंवा**

बार्टीच्या मोबाईल ॲप्लिकेशन (e-BARTI) वर (e-BARTI Android app>Registration>m-Governance>Fellowship) **दिनांक: ०५/०७/२०२१ ,रात्रौ ००:०१ वा.ते दि. ३१/०७/२०२१, रात्रौ २३:५९ वाजेपर्यंत** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

५. अर्जादारांकरिता ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना, मार्गदर्शक तत्वे बार्टीच्या https://barti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धआहेत.

६. बार्टीस ऑनलाइन अर्ज सादर करताना खोटी माहिती सादर केल्यास प्रस्तुत BANRF-२०१९ व BANRF-२०२० व यापुढील सर्व निवड प्रक्रियेसाठी अर्जदारास अपात्र ठरविण्यात येईल.

७. वर नमूद केलेल्या अधिछात्रवृत्ती संख्या,आरक्षण,अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे संपुर्ण अंतिम अधिकार महासंचालक, बार्टी यांनी राखून ठेवलेले आहेत.

८. ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास हेल्पलाईन क्रमांक: ०२०-२६३३३३३०/२६३३३३३९/२६३४३६०० (सकाळी १०:०० ते रात्रौ ०६:०० वाजेपर्यंत) / ई मेल – research1@barti.in वर संपर्क साधावा.

**मा. महासंचालक यांचे मान्यतेने.**

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: /०६/२०२१**

**विभाग प्रमुख (योजना)**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे.**